# फ्रेंचायसी करारपत्र (Franchise Agreement)

(कम्प्युटर शिक्षण संस्था फ्रेंचायसी करिता)

## 1 करारातील पक्षांची माहिती

हा करार दिनांक ___ / ___ / 20___ रोजी खालील दोन पक्षांमध्ये केला जात आहे:

फ्रेंचायझर ( सोसायटी):
सोसायटी नाव : ______________________
पत्ता : ____________________________
मो. नं. : __________________________
ई-मेल : ____________________________

फ्रेंचायसी (शाखा संस्था):
संस्थेचे नाव : ______________________
पत्ता : ____________________________
मो. नं. : __________________________
ई-मेल : ____________________________

दोन्ही पक्षांनी खालील अटी व शर्तींवर हा करार मान्य केला आहे.

## 2 कराराचा उद्देश

फ्रेंचायझर आपली कम्प्युटर शिक्षण संस्था, ब्रँड नेम, लोगो, कोर्स कंटेंट, सॉफ्टवेअर, प्रमाणपत्र आणि प्रशिक्षण प्रणाली यांचा वापर करण्याचा हक्क फ्रेंचायसी संस्थेला देत आहे.

## 3 करार कालावधी (Duration)

हा करार दिनांकापासून ____ वर्षांसाठी वैध राहील (उदा. 3 वर्षे). करार संपल्यानंतर दोन्ही पक्षांच्या सहमतीने तो नूतनीकरण (Renewal) करता येईल. या नूतनीकरणासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा Renewal Charges आकारले जाणार नाहीत.

4 शुल्क व पेमेंट

1. एक-वेळ फ्रेंचायसी फी (One Time Franchise Fee):

₹__________ (कराराच्या वेळी देय)

2. फ्रेंचायसी फी भरण्याची पद्धत:

फ्रेंचायसी फी ही खालीलप्रमाणे दोन टप्प्यांमध्ये भरली जाईल

(अ) पहिला टप्पा: -

करारावर स्वाक्षरी करताना एकूण फ्रेंचायसी फीपैकी ठरलेली रक्कम फ्रेंचायझरकडे भरणे फ्रेंचायसीस बंधनकारक राहील.

(ब) दुसरा टप्पा: -

फ्रेंचायसी संबंधित कामकाज (Franchise Work) ५०% पूर्ण झाल्यानंतर उर्वरित फ्रेंचायसी फी फ्रेंचायझरकडे भरणे आवश्यक राहील.

3. रॉयल्टी शुल्क लागू नाही:

फ्रेंचायसीकडून दरमहा किंवा दरवर्षी कोणत्याही प्रकारची रॉयल्टी फी घेतली जाणार नाही.

4. विद्यार्थी प्रमाणपत्र शुल्क:

प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रमाणपत्रासाठी ठरलेली Balance रक्कम फ्रेंचायझर (Head Office) कडे जमा करणे बंधनकारक राहील.

5. पेमेंट पद्धत:

सर्व पेमेंट्स फ्रेंचायझरच्या अधिकृत बँक खात्यातच जमा करावीत.

## 5 फ्रेंचायझरकडून मिळणाऱ्या सुविधा व सपोर्ट

(अ) ब्रँड व आयडेंटिटी सपोर्ट
- संस्थेचे नाव व लोगो वापरण्याची परवानगी
- ब्रँड मार्गदर्शक तत्वे: लोगो वापर, रंग, फॉन्ट, बॅनर, सोशल मीडियासाठी टेम्पलेट्स
- प्रमाणपत्र फॉरमॅट व डिझाईन

(ब) कोर्स व अकॅडमिक सपोर्ट
- सर्व कोर्सचे अभ्यासक्रम व सिलेबस
- मुद्रित व डिजिटल स्टडी मटेरियल, व्हिडिओ ट्युटोरियल्स
- नमुना प्रश्नपत्रिका व चाचण्या
- शिक्षक प्रशिक्षण मॉड्यूल
- नवीन सॉफ्टवेअर व अपडेट्सची माहिती

(क) सॉफ्टवेअर व टूल्स
- अधिकृत सॉफ्टवेअर लायसेन्सेस (MS Office, Tally, Graphic Designइ.)
- लॅब सेटअप मार्गदर्शन (With Support) -मार्केटिंग सॉफ्टवेअर

(ड) मार्केटिंग व प्रमोशन सपोर्ट
- डिजिटल मार्केटिंग सहाय्य
- स्थानिक जाहिरातींसाठी मार्गदर्शन
- अधिकृत वेबसाइटवर फ्रेंचायसी पेज लिस्टिंग
_ ब्राउझर्स व पाम्पलेट

(ई) ऑपरेशनल सपोर्ट
- फ्रँचायसी ऑपरेशन मॅन्युअल
- प्रवेश प्रक्रियेसाठी मार्गदर्शन
- शिफारस केलेले कोर्स फी व पॅकेजेस
- विद्यार्थी व्यवस्थापन

(फ) ट्रेनिंग व सतत सपोर्ट
- प्रारंभिक प्रशिक्षण (२–५ दिवस)
- नियतकालिक कॉल्स/व्हिजिट्स
- ॲडमिशन, सॉफ्टवेअर किंवा कोर्स संदर्भातील समस्या निराकरण

(ग) कायदेशीर व नोंदणी सहाय्य
- फ्रँचायसी करार, ट्रेडमार्क व कॉपीराईट परवानगी

(घ) सेटअप सपोर्ट
- उपकरणे व फर्निचर मार्गदर्शन
- ऑफिस व लॅब मटेरियल पुरवठा
- ब्रँड नोंदणी, ISO, CDTC, MSME, Udyom Aadhar, Franchisee प्रमाणपत्र सहाय्य
- इंटरनेट व डिजिटल डेटाचा प्रवेश
- ब्रांच पॅकेजेस: सिल्व्हर, गोल्ड, प्लॅटिनम

(ङ) अतिरिक्त फायदे (Optional Benefits)
- विद्यार्थ्यांसाठी सॉफ्टवेअर सवलत
- फ्रँचायसी  डॅशबोर्ड
- प्रमाणपत्र  प्रिंटिंग सपोर्ट

## 6 फ्रँचायसीच्या जबाबदाऱ्या

- संस्थेचे नाव, लोगो, कोर्स फॉरमॅट आणि क्लास स्ट्रक्चरमध्ये कोणताही बदल न करता जशास तसे वापरणे.
- विद्यार्थ्यांच्या फीची योग्य नोंद ठेवणे आणि अटेन्डन्स (उपस्थिती) नियमितपणे घेणे.
- फ्रँचायझरच्या सर्व नियमांचे पालन करणे.
- वर्गात व प्रशासनात शिस्त व गुणवत्तेचे पालन करणे.
- गोपनीय माहिती (कोर्स कंटेंट, सॉफ्टवेअर, किंमती) इतरांना न सांगणे.

## 7 गोपनीयता करार (NDA)

फ्रँचायसीने फ्रँचायझरची कोणतीही गोपनीय माहिती तिसऱ्या व्यक्तीस दिल्यास त्यास कायदेशीर जबाबदार धरले जाईल आणि करार तत्काळ रद्द केला जाऊ शकतो.

## 8 तपासणी व मूल्यांकन

फ्रँचायझरला कोणत्याही वेळी फ्रँचायसी सेंटर तपासण्याचा आणि मूल्यांकन करण्याचा अधिकार राहील.

## 9️⃣ दंड व नियमभंग (Penalty Clause)

- करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास फ्रेंचायझरला करार रद्द करण्याचा अधिकार आहे.
- गोपनीय माहिती लीक केल्यास ₹40,000 पर्यंत दंड व कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## 🔟 वाद निवारण (Dispute Clause)

या करारासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास तो मुख्य शाखेचे अधिकारी सोडवतील. फ्रेंचायझरचे मुख्य कार्यालय (Head Office) यांना त्या कार्याचे संपूर्ण अधिकार राहतील. गरज पडल्यास वाद शहराचे न्यायालयात सोडविला जाईल.

## 1️⃣2️⃣ स्वाक्षऱ्या व साक्षीदार

फ्रेंचायझर (Franchisor):

________________________________

स्वाक्षरी : ______________

फ्रेंचायसी (Franchisee):

________________________________

स्वाक्षरी : ______________